## थंडी

थंडीचा कडाका,
गारठले अंग..
मोजे - कानटोपी..
घालूनी बसावे !
बाहेर जाण्याची,
मुळी ना सोय..
घरचा कोंबडा..
होऊनी बसावे !
दात वाजती,
कडाड कडाड..
शब्द आणि मुग,
गिळूनी बसावे !
खरे तर असावी
थंडी ही गुलाबी...
वेगळाच रंग,
बघुनी बसावे !
ग्लोबल वार्मिंग
असा हा खेळ..
त्याचेच प्यादे..
बनुनी बसावे !

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**